प्रतिवादी क्र. ३ तर्फे साक्षीदार क्र.१ सौ. सविता महेश ठाकरे -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.आर.चक्रवर्ती/कु. महाजण यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास वादी तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. सारंग देवळे यांद्वारे -

२. माझे एम.एस.सी. बी.एड आहे. मी कोचिंग क्लॅसेस घेते. वादमिळकत मी विकत घेण्यापुर्वी पाहिली होती. सन २००६ मध्ये मी वादग्रस्त मिळकत पाहिली होती. मी शेती बघीतली तेव्हा त्यामध्ये कोणतेही पिक नव्हते. प्रतिवादी क्र.२ ने सांगितले होते की पुर्वी त्यामध्ये कापसाचे पिक होते. हे मला माहित नाही की ज्यावेळेस मी शेतजमिन घेतली त्यावेळेस वादीचा वादग्रस्त मिळकतीमध्ये कब्जा होता. शेती घेण्याच्या आगोदर मी शेतीबददलचे कागदपत्रे पाहिली होती. मी दुय्यम निबंधक कार्यालयात जावुन, सदर वादमिळकतीबाबत खरेदीपत्र झाले आहे किंवा नाही याबाबत शोध घेतला होता. मी आणि माझ्या पतीने, दुययम निबंधक कार्यालयात जावुन, शोध घेतला होता, तसेच तेथील अधिका-याकडे चौकशी केली होती. मी शोध घेण्याकरीता पावती बनविली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आम्ही कोणताही शोध घेतला नाही, त्यामुळे कोणतीही पावती दाखल केली नाही. माझे पती महसुल खात्यामध्ये तलाठी म्हणुन कार्यरत होते. सन २००६ मध्ये माझे पती पारशिवनी अधिकार क्षेत्रात कार्यरत होते. हे मला माहिती नाही की त्यावेळेस माझे पती हे सालई गावाचे तलाठी होते (वादग्रस्त मिळकत असलेल्या गावचे).

३. विक्रीपत्र झाल्यानंतर, मी माझ्या घरी परत आले. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर मला वादग्रस्त मिळकतीमध्ये जाण्याचे काम पडले नाही. मी शेतीचे सर्वे नं. १२३/१ आहे. शेतीचा तलाठयाकडे गावनकाशा पाहिला आहे. हे मला माहित नाही की सर्वे क्र.१२३/१ आणि १२३/२ असे दोन वेगवेगळे नकाशे झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्यासमोर, वादग्रस्त मिळकतीची आजतागायत मोजणी झाली नाही. माझा हिस्सा कोणता आहे आणि बाजुवाल्याचा हिस्सा कोणता

आहे हे मी सांगु शकत नाही. मी शेताची चतुर्सिमा सांगु शकतो. शेतजमिनीच्या पुर्व बाजुला शर्मा याचे शेत आहे. पश्चिमेला खान यांचे शेत आहे. उत्तरेला कोळवते यांचे शेत आहे आणि दक्षिणेला सर्वे नं.१२० आहे त्यांचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की मी शेतामध्ये जात नसल्यामुळे मी आजुबाजुच्या लोकांचे नावे, दक्षिण बाजुचे माहित नाही. वादी त्यांच्या कागदपत्राच्या आधारे हक्क सांगत आहे. वादीजवळ कोणता कागद आहे याची मला माहिती नाही. माझ्या वकीलांनी वादीने कशाच्या आधारे दावा दाखल केला आहे, याची मला माहिती दिलेली आहे. वादीचे खरेदीपत्र रदद करण्याकामी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ आणि २ ला, वादीचे खरेदीपत्र समजल्यानंतर कोणतीही लेखी नोटीस पाठविली नाही.

प्रश्न– वादीचे खरेदीपत्र खोटे आहे याबाबत काही पुरावा दिला आहे का ?

उत्तर आमच्या जवळ आमच्या खरेदीपत्राचा पुरावा आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला, वादीच्या खरेदीपत्राची नोंद, फेरफार न झाल्याचे माहित असल्यामुळे, त्यांनी जानिवपुर्वक प्रतिवादी क्र.१ आणि २ कडुन खोटे खरेदीपत्र करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, माझे खरेदीपत्र हे खोटे व बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीने वादग्रस्त मिळकतीवर त्याचा नावाचा बोर्ड आणि कंपाउंड घातलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त मिळकतीवर वादीचा ताबा व वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे खरेदीपत्र मला खरे सिद्ध करण्याचे असल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.18 17:41:25 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक १६.०३.२०२६.
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १२

वादीतर्फे साक्षीदार क्र.२ पुष्पा जगदीश सोनवने -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १३ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १४

वादीतर्फे साक्षीदार क्र.३ मनोज तुकाराम बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १५ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १६

वादीतर्फे साक्षीदार क्र.४ करिष्मा मनोज बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १७ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)